# नियमित दिवाणी दावा क्र. ३१९/२०१५ मधील निशाणी ३५ वरील आदेश

( संतोष मोडक वि. शांताराम कटके )

१. वादींनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६, नियम—१७ अन्वये दाखल केलेला आहे.

अर्जाची थोडक्यात हकिकत खालीलप्रमाणे :—

२. वादींनी ठराव, वाटप व निरंतर ताकिदीसाठी दिलेला दावा प्रलंबित आहे. दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. १ याने बेकायदेशीरपणे प्रतिवादी क्र. ९ व १० यांना दिनांक ०१/०२/२०१८ रोजी काही मिळकतींचे खरेदीखत करुन दिले आहे. प्रतिवादी क्र. १ ते ७ यांनी रेमुनं २८१/२०११ या मधील हुकूमनाम्याचा अंमल करुन घेतलेला आहे. प्रतिवादी क्र. १ यांनी केलेल्या व्यवहाराला अजित व गणेश कटके आणि सोनाली वाडकर यांनी संमती दिलेली आहे. वादींनी सदर खरेदीदारांना दाव्यात पक्षकार करुन खरेदीखताबाबत अनुतोष मिळावा अशी दुरुस्ती करण्याची परवानगी मागितली आहे.

३. प्रतिवादींनी निशाणी—४० वर म्हणणे देवुन सदर अर्जास जोरदार हरकत घेतलेली आहे. प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार, सदर अर्ज कायद्याने चालणारा नाही. रेमुनं २८१/२०११ मधील हुकूमनामा सात वर्षांपूर्वी झालेला आहे. त्याप्रमाणे फेरफार क्र. ४२३७ मंजुर झालेला आहे. वादींनी त्याविरुद्ध अपिल केलेले नाही. वादींनी खरेदीखताबाबत कोर्ट फी स्टॅंप दिलेला नाही. या न्यायालयास अधिकार क्षेत्र रहाणार नाही. प्रतिवादी क्र. १ यांनी सदर खरेदीखत कायदेशीर अडचणी निवारण्यासाठी केलेले आहे. प्रतिवादी मारुती याने दिनांक १२/०१/१९९२ रोजी बक्षिसपत्र करुन दिलेले असून ते कायदेशीर आहे. सदर अर्ज खर्चासह नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

सदर दावा ठराव, वाटप व निरंतर ताकिदीसाठी दाखल केलेला आहे. वादींनी दिलेला तूर्तातूर्त मनाईचा अर्ज निशाणी–५ अद्याप प्रलंबित आहे. सदर प्रकरणात वाद मुद्दे निश्चित केलेले नाहीत. त्यामुळे सदर प्रकरणातील सुनावणी अद्याप सुरु झालेली नाही. वादी दावा प्रलंबित असताना झालेल्या व्यवहाराबाबत अनुतोष मागण्याची दुरुस्ती दाव्यात करु इच्छितात.

५. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश–६ नियम १७ प्रमाणे कोणताही पक्षकार दाव्याच्या कोणत्याही स्थितीत आपल्या कथनामध्ये दुरुस्ती करु शकतो. सदर तरतूदीच्या परंतुकामध्ये एखाद्या पक्षकाराने सावधानता बाळगूनही जर त्यास सुनावणी सुरु होण्यापूर्वी दुरुस्ती अर्ज देणे शक्य झाले नसल्यास तो पक्षकार सुनावणीस सुरुवात झाल्यानंतरही दुरुस्ती अर्ज देवू शकतो असे नमुद केलेले आहे.

६. वादीने निशाणी–३८ वरील यादीसोबत दिनांक ०१/०२/२०१८ रोजीच्या खरेदीखताची प्रत दाखल केलेली आहे. त्याचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र. १ याने अजित शांताराम कटके, गणेश शांताराम कटके व सोनाली नितीन वाडकर यांच्या संमतीने दत्तात्रय शंकर काळे व अनिल मारुती ढवळे यांना गट नं १०३९ पैकी काही क्षेत्राची विक्री केल्याचे दिसून येते. सदर खरेदीदारांच्या नावाने सदर मिळकतीमध्ये हितसंबंध निर्माण झालेला आहे.

७. वादीनी मागितलेली दुरुस्ती सदर प्रकरणातील सर्व वाद विषय एकाचवेळी निकाली काढण्यासाठी उपयोगाची ठरणार आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. दावा प्रलंबित असताना प्रतिवादींनी केलेल्या व्यवहारामुळे वादीला दाव्यात दुरुस्ती करणे भाग पडले आहे. प्रतिवादी क्र. ९ ते १३ हे दाव्यात आवश्यक पक्षकार आहेत. त्यांची न्यायालयासमोरील हजेरी दाव्याचा परिणामकारकपणे निकाल करण्यासाठी उपयोगाची ठरणार आहे. त्यामुळे वादींना दाव्याची दुरुस्ती करण्याची परवानगी

देणे योग्य व न्यायोचित होईल. सबब, वरील सर्व विवेचनावरुन मी खालील आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. अर्ज निशाणी— ३५ मंजुर करण्यात येत आहे.

२. वादींनी पुढील तारखेदिवशी किंवा त्यापुर्वी दाव्यात प्रस्तावित दुरूस्ती करून दुरूस्त दाव्याच्या प्रती सादर कराव्यात.

३. वादींनी सदर दाव्यात समाविष्ट केलेल्या मागणीबाबत आवश्यक तो कोर्ट फी स्टॅम्प द्यावा.

दिनांक : २४/०७/२०१८ ( वैभव क. जाधव )
ठिकाण : सासवड दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सासवड.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file order are same word for word as per original order.

Name of Steno: G. S.Chougule, Steno L.G.
Name of Court : Shri. V.K. Jadhav.
CJJD, Saswad.
Date : 24/07/2018

Order signed by Presiding Officer on : 24/07/2018

Order uploaded on : 02/08/2018